दि. २२.०४.२०२४

# प्रेस नोट

| | | |
|---|---|---|
| १. | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक | लातूर |
| २. | पोलीस स्टेशन, गुन्हा नोंद क्रमांक | शिवाजी नगर,लातूर जि.लातूर |
| ३. | कलम | कलम ७ भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८. |
| ४. | तक्रारदार | पुरूष, वय– ४३ वर्षे |
| ५. | आरोपी लोकसेवक यांचे नाव, हुद्दा व पत्ता | बालाजी वसंतराव अडसुळे, वय ५० वर्षे, पद– आगार व्यवस्थापक, वर्ग २, नेमणूक– महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ, लातूर आगार, लातूर, रा. दत्ता हॉस्पीटल जवळ, कव्हेरी रोड, कॉईल नगर, लातूर. |
| ६ | ठिकाण | महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ, लातूर आगार, लातूर आगार व्यवस्थापक यांचे कक्षात, छत्रपती शिवाजी महाराज चौक, लातूर |
| ७ | मागणी केलेली लाचेची रक्कम | २,०००/–रू. |
| ८ | तडजोडीअंती लाच मागणी रक्कम | २,०००/– रू. |
| ९ | स्विकारलेली लाचेची रक्कम | २,०००/– रू. |
| १० | पडताळणी दिनांक | ०८/०४/२०२४ |
| ११ | सापळा दिनांक | २२/०४/२०२४ |
| १२ | **थोडक्यात माहिती :–** यातील तक्रारदार हे म महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ, लातूर आगार येथे एसटी बस चे चालक (ड्रायव्हर) आहेत त्यांचे घरी लग्नकार्य व घराचे बांधकाम असल्याने त्यांनी सन २०२४–२५ वर्षातील १५ दिवस अर्जित रजा व १५ दिवस रजा रोखीकरण मंजूर होण्याकरीता दि २०/०३/२०२४ रोजी आगार व्यवस्थापक अडसुळे यांचे कडे अर्ज दिला होता.<br>सदर रजा मंजूरीच्या अनुषंगाने तक्रारदार हे दि ०५/०४/२०२४ रोजी आगार व्यवस्थापक बालाजी अडसुळे यांचे कडे गेले असता अडसुळे यांनी अर्जित रजा व रजा रोखीकरण मंजूर केल्याचा मोबदला म्हणुन तक्रारदार यांच्या कडे २,०००/–रू लाचेची मागणी केली. तक्रारदार यांची लाच देण्याची ईच्छा नसल्याने त्यांनी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग लातूर यांच्या कडे तक्रार केली.<br>दि ०८/०४/२०२४ रोजी शासकीय पंचासमक्ष लाच मागणी पडताळणी केली असता आरोपी लोकसेवक अडसुळे यांनी तक्रारदार यांना २,०००/– रू लाचेची मागणी केली.<br>आज दिनांक २२/०४/२०२४ रोजी सदर लाचेची रक्कम अडसुळे यांनी लातूर आगारात स्वतःचे कार्यालयात शासकीय पंचासमक्ष स्वतः स्विकारली आहे त्यावेळी आरोपीस सापळा पथकाने लागलीच लाचेच्या रकमेसह ताब्यात घेतले असुन पोलीस स्टेशन शिवाजी नगर, लातूर येथे गुन्हा दाखल करण्याची पुढील प्रक्रिया चालू आहे. | |

सदरची सापळा कार्यवाही डॉ. राजकुमार शिंदे, पोलीस अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नांदेड परिक्षेत्र, नांदेड यांचे मार्गदर्शनानूसार ला.प्र.वि. लातूर चे पोलीस उप अधीक्षक संतोष बर्गे, पोलीस निरीक्षक भास्कर पुल्ली, पोलीस निरीक्षक अन्वर मुजावर, पोह/फारूक दामटे, भिमराव आलुरे, शाम गिरी, पोकॉ/शिवशंकर कच्छवे, मपोकॉ/रूपाली भोसले, पोकॉ/संदिप जाधव, पोकॉ/मंगेश कोंडरे पोकॉ/दिपक कलवले, पोकॉ/गजानन जाधव, चापोना/संतोष क्षिरसागर यांनी पार पाडली आहे.

तरी सर्व नागरीकांना आव्हान करण्यात येते की, शासकीय अधिकारी/कर्मचारी हे शासकीय काम करण्यासाठी लाचेची मागणी करीत असल्यास तसेच त्यांचे लाचेच्या मागणी संदर्भात खालील क्रमांकावर संपर्क करावा.

१) डॉ. राजकुमार शिंदे, पोलीस अधीक्षक :– मोबाईल क्रमांक ०९६२३९९९९४४
२) श्री. संतोष बर्गे, पोलीस उप अधीक्षक :– मोबाईल क्रमांक ०७७४४८१२५३५
३) टोल फ्री :– १०६४
४) हेल्पलाईन क्रमांक कार्यालयाचा फोन क्रमांक :– ०२३८२–२४२६७४
५) Website :– www.acbmaharashtra.gov.in
६) Mobile App :– www.acbmaharashtra.net
७) Facebook Page :– www.facebook.com/maharashtraACB
८) Twitter :– ACBlatur
९) Instagram :– Acblatur
१०) YouTube Channel :– anticurruptionbureaulatur1584

पोलीस उपअधिक्षक लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,लातूर

(संतोष घ.बर्गे)
पोलीस उप अधीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, लातूर